# RESEARCH PROMOTION SCHEME

## लघु संशोधन प्रकल्प

## ‘‘तासगाव तालुक्यातील वंचित घटकांच्या मानवी विकास निर्देशाकांचा अभ्यास’’

**संशोधन प्रोत्साहन योजना**

**पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव यास**

**लघु संशोधन प्रकल्प सादर**

**सहभागी विद्यार्थी**

कुमारी पाटील सुप्रिया रावसाहेब

श्री. सावंत विनोद जालिंदर

कुमारी पाटील पूनम बाळासो

श्री. चव्हाण सुशांत सुभाष

श्री. शिंदे राहूल मुरलीधर


संशोधक /सादरकर्ते

डॉ. बंडू जयसिंग कदम

(एम. ए.,एम. फिल.,पीएच.डी., पी जी डी सी जी)

सहाय्यक प्राध्यापक,

अर्थशास्त्र विभाग,

पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव,

ता. तासगाव, जि. सांगली.

मार्गदर्शक

डॉ. मिलिंद एस.हुजरे

प्राचार्य,

पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव,

ता. तासगाव, जि. सांगली.


2020-21

# सारांश

**प्रस्तावना**

'मानवी विकास निर्देशांक' ही संकल्पना जगातील देशांचे अतिविकसित (अतिउच्च मानवी विकास), विकसित (उच्च मानवी विकास), विकसनशील (मध्यम मानवी विकास) व अविकसित (कमी मानवी विकास) असे वर्गीकरण करण्यासाठी वापरली जाते.जगात सर्वच देशात आर्थिक विकास साध्य करणेचा प्रयत्न केला जातो. आर्थिक विकासाचे मापन स्थूल करणेचा प्रयत्न केला जातो.आर्थिक विकासाचे मापन स्थूल राष्ट्रीय उत्पादन (GNP) या निकषाच्या आधारे केले जाते. अलिकडील काळात आर्थिक विकासाच मापन विकासाचे व्यापक विस्तारित निर्देशांक तयार करून केले जाते.'मानवी विकास निर्देशांक (HDI) ही संकल्पना संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमाद्वारे (UNDP) मांडण्यात आली आहे.संयुक्त राष्ट्रसंघाने 1990 मध्ये पहिला मानवी विकास अहवाल लंडन येथे प्रकाशित केला. त्याचे ताबडतोब जगभर स्वागत करण्यात आले. कारण हा अहवाल लोकांच्या विकासाचा दर केला आहे. मानवी विकास निर्देशकांची संकल्पना सर्वात प्रथम मांडण्याचे श्रेय डॉ. मेहबूब-उल-हक यांच्याकडे जाते. त्यांनी बौध्दीक व संख्याशास्त्र पातळीवर तीन भारतीय अर्थतज्ञ डॉ. अमर्त्य सेन, मेघनाथ देसाई व सुधीर आनंद यांची मोठया प्रमाणावर मदत घेतली.विशेषतः त्यामध्ये 1998 च नोबेल पारितोषक विजेते व भारतीय कल्याणकारी अर्थशास्त्राचे अभ्यासक डॉ. अमर्त्य सेन यांचा मोलाचा वाटा आहे.

डॉ. मेहबूब-उल-हक यांच्या मते 'आर्थिक वृध्दी आणि मानवी विकास यातील मुलभूत फरक म्हणजे आर्थिक वृध्दीचा सहसंबंध फक्त उत्पन्नाच्या वाढीसी आहे' मानवी विकासाचा संबंध मात्र मानवी जीवनाशी निगडीत आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक घटक जे मानवी जीवनाची गुणवत्ता वाढवते इत्यादीशी असतो. काहीवेळा असही म्हटलं जातं की, उत्पन्न वाढीबरोबरच इतरही

घटकांचा आपोआप विस्तार होत असतो. परंतू हे म्हणणे तितकेसे खरे नाही. कारण एकतर समाजात उत्पन्नाची विषम विभागणी झालेली असते. दुसरं म्हणजे मानवी विकासात भर टाकणाऱ्या कितीतरी घटकाचा उत्पन्नाशी थेट संबंध नसतो. उत्पन्नाची कोणतीही पातळी असली तरी सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक परंपरा टिकविल्या जाणे आवश्यक असते.सरासरी आर्युमान, शिक्षणाची पातळी, आरोग्य सेवांची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याची सोय, संपर्क माध्यमांची सोय, कौशल्य निर्मितीची व्यवस्था या गोष्टी मानवी विकास निर्देशांकात महत्वाच्या आहेत. मानवी विकास निर्देशांक ही आशियाई तज्ञांची अर्थशास्त्रीय विश्लेषणातील भरीव देणगी मानता येईल. सुरूवातीच्या काळात टिकाकारांच्या टिका लक्षात घेवून डॉ. हक आणि डॉ. सेन यांनी बऱ्याचशा दुरूस्त्या केल्या.तिथून मानवी विकास निर्देशांक हा सार्वत्रिक पातळीवर प्रगतीचा मापदंड मानला जावू लागला.मागास देश तसेच विकसीत देश अशा दोन्ही भागात मानवी विकास निर्देशांकाप्रमाणे आपला क्रमांक कोठे लागतो याला महत्व दिले जाऊ लागले. एवढेच नव्हे तर राष्ट्रांनी आपला क्रमांक चुकीचा लागला आहे अशा तक्रार केल्या. 1990 मध्ये मानवी विकास अहवालामध्ये मानवी विकास निर्देशांकाप्रमाणे अमेरिकेचा नंबर 17 वा होता.तो 1991 मध्ये 7 वा कंमाक करण्यासाठी राजकीय स्तरावरती अमेरिकन सरकारला मोठी धडपड करावी लागली असे सांगितले जाते.

1996 मध्ये डॉ. महमूल-उल-हक यांनी इस्लामाबाद येथे मानवी विकास केंद्र स्थापन केले व या केंद्रामार्फत दक्षिण आशियाई राष्ट्रांसाठी मानवी विकास अहवाल प्रसिध्द करण्याची प्रथा सुरू करण्यात आली. यातील दुसरा वार्षिक अहवाल 1998 मध्ये दिल्ली येथून प्रसिध्द करण्यात आला. डॉ. अमर्त्य सेन यांनी शिक्षण व मानवी भांडवलाचा विकास यांच्यातील धनात्मक संबंध स्पष्ट केला. मानवी साधन संपत्तीचा विकास शिक्षणापूर्तीमूळे होतो व मानवी साधन संपत्तीचा विकासामुळे देशाच्या आर्थिक विकासास चालना मिळते. म्हणजेच आर्थिक विकास हे मानवी विकासाचे फल आहे. मानवी विकास हा शिक्षणाच्या गुणात्मक प्रसारावर अवलंबून असतो.

मानवी विकासाशी संबंधित मानव निवडीचे असे अनेक घटक आहेत की जे उत्पन्नावर अवलंबून नाहीत. ते म्हणजे ज्ञान, आरोग्य, स्वच्छ भौतिक पर्यावरण, राजकीय स्वातंत्र्य, जीवनाचा निर्णय, आनंद इ. आहेत. पैशामुळे लोकांच्या घटक निवडीचे क्षेत्र विस्तारत जात असले तरी हे नक्की आहे. मानवी विकासासाठी क्षमता, उत्पादकता, राहणीमान हे घटक आवश्यक ठरतात. यावरच समाज निर्मिती अवलंबून असते.

मानवी विकास म्हणजे लोकांना उपलब्ध असलेल्या निवड पर्यायांचा विस्तार करण्याची प्रक्रिया होय. यापैकी सर्वात महत्वाची बाबी म्हणजे जेणेकरून व्यक्तींना दीर्घायुष्य व निरोगी जीवन लाभेल अशा बाबी होय. त्याचप्रमाणे या प्रक्रियेत नागरिकांना शिक्षणाचा तसेच सुखी जीवनाचा लाभ देण्याच्या बाबी. त्याखेरीज लोकांना राजकीय स्वातंत्र्य, मानवी हक्कांची हमी व स्वाभीमानाने जगण्याची हमी इ. मिळायला पाहिजे. दोन देशांचे उत्पन्न सारखेच असले तरी त्या दोन देशांचा मानवी विकास निर्देशांक भिन्न असू शकतो.या पार्श्वभूमीला मानवी समाजाचा विकास म्हणजे, त्या समाजाचा सर्वांगीण विकास होय. त्या समाजाच्या कोणत्याही क्षेत्रातील विकासाकडे त्या दृष्टीने पाहिले पाहिजे. त्यावेळी ‘मानवी विकास’ या संकल्पनेस अर्थ प्राप्त होईल. म्हणजेच मानवी विकास हा मानवी विकास निर्देशांकाच्या साहाय्याने स्पष्ट करता येईल.

आजही बऱ्याच वंचित घटक विकासापासून वंचित पाहावयास मिळतात. यामध्ये प्रामुख्याने विधवा, घटस्फोटित स्त्रिया, निराधार स्त्रिया, मागासवर्गीय स्त्रिया इत्यादींचा समावेश होतो. सर्वसमावेशक विकासाचे स्वप्न सत्यामध्ये आणण्यासाठी यांच्या विकासासाठी सुरुवात करणे काळाची गरज बनली आहे. वंचित स्त्रियाच्या घटकांचा विकास आजही कमी प्रमाणात झालेला दिसून येतो. प्रस्तूत अभ्यासामध्ये अशा वंचित घटकांचा मानवी विकास निर्देशांकाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

सन 2017 च्या मानवी विकास अहवालानूसार सर्वात जास्त मानवी विकास निर्देशांक नॉर्वे या देशाचा असून तो 0.949 इतका आहे.सर्वात कमी मानवी विकास निर्देशांक नायजर या देशाचा असून तो फक्त 0.337 इतका आहे.भारताचा मानवी विकास निर्देशांक याच वर्षात 0.624 इतका होता. जागतिक क्रमवारीत भारत 131 व्या स्थानी आहे.

**भारतातील प्रमुख राज्यांचा मानवी विकास निर्देशांक**

भारतातील प्रमुख राज्यांचा निर्देशांक पुढीलप्रमाणे

**तक्ता क्रमांक :1.1**

**भारतातील प्रमुख राज्यांचा मानवी विकास निर्देशांक**

| अ.क्र. | राज्यांचे नाव | मानवी विकास निर्देशांक |
|---|---|---|
| 1 | केरळ | 0.712 |
| 2 | दिल्ली | 0.750 |
| 3 | महाराष्ट्र | 0.666 |
| 4 | कर्नाटक | 0.618 |
| 5 | उत्तरप्रदेश | 0.542 |
| 6 | छत्तीसगड | 0.358 |

स्त्रोत : मानवी विकास निर्देशांक 2019

भारतातील वरील सहा राज्यांचा मानवी विकास निर्देशांक दर्शविला असून केरळचा सर्वाधिक दर तर छत्तीसगडचा सर्वात कमी असून महाराष्ट्राचा निर्देशांक देशात तिसऱ्या क्रमांकाचा आहे.

**महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हयांचा मानवी विकास निर्देशांक**

महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हयांचा मानवी विकास निर्देशांक पुढील तक्त्यात स्पष्ट केला आहे.

**तक्ता क्रमांक : 1.2**

महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हयांचा मानवी विकास निर्देशांक

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | मानवी विकास निर्देशांक |
|---|---|---|
| 1 | मुंबई | 0.841 |
| 2 | पुणे | 0.814 |
| 3 | कोल्हापूर | 0.759 |
| 4 | नाशिक | 0.742 |
| 5 | सोलापूर | 0.718 |
| 6 | रत्नागिरी | 0.722 |
| 7 | सांगली | 0.753 |

स्त्रोत : मानवी विकास निर्देशांक महाराष्ट्र राज्य 2019

वरील तक्ता क्रमांक 2 मध्ये महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हयांचा 2017नूसारचा मानवी विकास निर्देशांक दर्शविला आहे.

वरील तक्तामध्ये महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हयांचा मानवी विकास निर्देशांक स्पष्ट केला आहे.महाराष्ट्रात 0.841 नुसार मानवी विकास निर्देशांक सर्वात जास्त मुंबई चा तर सर्वात कमी सोलापूरचा आहे. कोल्हापूर जिल्हयाचा मानवी विकास निर्देशांक 0.759इतका आहे पुणे जिल्हयाचा मानवी विकास निर्देशांक 0.841 तर नाशिक जिल्हा 0.742 व सांगली जिल्हयाचा मानवी विकास निर्देशांक 0.753 इतका आहे.

**अभ्यासाची व्याप्ती :-**

या अभ्यासाचे शीर्षक, **''तासगाव तालुक्यातील वंचित घटकांच्या मानवी विकास निर्देशाकांचा अभ्यास''** असे आहे. हा अभ्यास करताना प्रामुख्याने तासगाव तालुक्यातील मानवी विकास निर्देशांक पाहिला आहे. संदर्भसहित अभ्यास म्हणून

सांगली जिल्हयातील इतर 11 तालुक्यांचा संक्षिप्त अभ्यास केला आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्याचा मानवी विकास निर्देशांक ही विचारात घेतला आहे. तासगाव तालुक्यातील वंचित घटकांचा मानवी विकास निर्देशांकाचा अभ्यास करताना दीर्घायुष्य, ज्ञान व जीवनमानाचा दर्जा या तीन मूलभूत निर्देशांकाचा अभ्यास करणे बरोबरच लोकसंख्या, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, बँका, विमा, पोस्ट, वाहतुक-दळणवळण इत्यादी निर्देशांकाचा अभ्यास केला. मानवी विकास निर्देशांक ही संकल्पना आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी वापरली जातात.परंतू या संकल्पनेच्या आधारे मानवी विकास निर्देशांक मोजताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास केला जाणार आहे. त्यामुळे या अभ्यासाचे महत्व वाढते.

**संशोधन समस्या विधान**

समाजामध्ये वंचित घटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे ही विकासाच्या दृष्टिने घातक आहे. वंचित घटकामध्ये प्रामुख्याने विधवा, घटस्फोटित स्त्रिया, निराधार स्त्रिया, मागासवर्गीय स्त्रिया इत्यादींचा समावेश होतो. वंचित घटक विकासापासून पूर्णपणे वंचित पाहावयास मिळतात. एका बाजूला विकास प्रक्रियेमध्ये पुरूषाप्रमाणे स्त्रियांचे स्थान तितकेच महत्त्वाचे मानत असताना वंचित वंचित घटकांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असताना दिसून येतात. कुटूंबाच्या समस्या सोडवणूक करू शकत नाही. स्वावलंबी जीवन जगू शकत नाही. या सर्वाचा परिणाम म्हणजे देशाचा विकास होवू शकणार नाही. वंचित घटकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी प्रस्तूत अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात केला आहे.

**संशोधनाचे महत्व**

मानवी विकास निर्देशांक ही आर्थिक विकास मोजण्यासाठी प्रमुख पध्दती आहे. सद्यस्थिती पाहिली असता देशाच्या आर्थिक विकासात मानवी विकास निर्देशांकाचे महत्व वाढत आहे. ''**तासगाव तालुक्यातील वंचित घटकांच्या मानवी विकास निर्देशाकांचा अभ्यास**''हा विषय अभ्यासासाठी मुद्दाम व हेतूपुरस्कर निवडला

आहे. कारण सांगली जिल्हयातील तासगाव हा प्रगत तालुका म्हणून पाहिले जाते. प्रगत तालुक्या पाठीमागील कारणमीमासाचा शोध घेणे. त्याचप्रमाणे तासगाव तालुक्यातील वंचित घटकांचा मानवी विकास निर्देशांक वाढविण्यासाठी ज्या घटकांची आवश्यकता आहे त्या घटकांची उपलब्धता होण्यासाठी उपाययोजना सुचविणे हे अभ्यास समस्या निवडीमागील कारण आहे.

आजच्या काळात देशाच्या आर्थिक विकासात मानवी विकास निर्देशांक या संकल्पनेचे महत्व वाढत आहे. विकसनशील देशाच्या विकासाचा दृष्टीने ही जमेची बाजू आहे.विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था असते.या अर्थव्यवस्थेत 70 टक्के लोक हे प्राथमिक क्षेत्राच्या विकासावर अवलंबून असतात.या क्षेत्रात सुधारणा करणेसाठी मानवी विकास निर्देशांक वाढला पाहिजे. विशेषतः या क्षेत्रातील स्त्रिया, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागास समाजातील लोकांची मानवी विकास निर्देशांकाचा अभ्यास करणे संयुक्तिक वाटते.

मानवी जीवन हे गतिमान बनले आहे.महाराष्ट्र व सांगली आणि अभ्यास क्षेत्रातील मानवी विकास निर्देशांकाचा अभ्यास करताना खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण यांचा प्रभाव वाढताना दिसत आहे.त्यामुळे मानवी विकासाचे चित्र बदलत आहे.या बदलाचा शोध घेणे व यासंबंधी वस्तुनिष्ठ अभ्यास आणि संशोधन करणे हा या अभ्यास निवडीमागील प्रमुख हेतू आहे.

अभ्यास क्षेत्रासाठी निवडलेल्या सांगली जिल्हयातील तासगाव तालुक्याची प्रगती आजमावली असता मानवी विकास निर्देशांकानी केलेली प्रगती उल्लेखनीय आहे. परंतू देशातील खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या आर्थिक सुधारणांचा मानवी विकास निर्देशांक वाढणेस कशी मदत झाली याचा शोध घेणे हे देखील अभ्यास निवडीमागील प्रमुख कारण आहे. आर्थिक व मानवी विकासाचे निर्देशांक हे मानवी विकास निर्देशांकाचे विश्लेषण करताना पाहणे आवश्यक आहे. यामध्ये लोकसंख्या स्त्री-पुरूष प्रमाण, राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न, शेती,

उद्योग, व्यापार व सेवा क्षेत्राचा स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा, आर्थिक विकासाचा दर, मानवी विकास निर्देशांकाचे मूल्य, मानवी दारिद्रय निर्देशांक, साक्षरता, आरोग्य, शिक्षण इत्यादीचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

**अभ्यासाची उद्दिष्टे :-**

1) भारत व महाराष्ट्र यांच्या मानवी विकास निर्देशांक पातळीचा अभ्यास करणे.

2) सांगली जिल्हा व तासगाव तालुका क्षेत्रातील वंचित घटकांच्या मानवी विकास निर्देशांक अभ्यास करणे.

3) अभ्यास क्षेत्रात येणाऱ्या समाजातील वंचित घटकांचे जातीनुसार मानवी विकास निर्देशांक अभ्यास करणे.

4) मानवी जीवन, शिक्षण व राहणीमान यांच्या साहाय्याने तासगाव तालुका क्षेत्रातील वंचित घटकांच्या मानवी विकास निर्देशांक अभ्यास करणे.

5) वंचित घटकांचा मानवी विकास निर्देशांक वाढविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

**अभ्यासाची गृहितके:-**

1) समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचा विशेषता वंचित घटकांचा मानवी विकास निर्देशांक अत्यंत कमी आहे.

2) मानवी विकास निर्देशांकाच्या रचनेवरून वंचित घटकांची आर्थिक व सामाजिक प्रगती समजते.

3) वंचित घटकांचा सर्वसमावेशक विकास झालेला नाही कारण विशेष योजना त्यांच्यापर्यंत पोहचल्या नाहीत.

**संशोधन पध्दती व तथ्य संकलन :-**

अभ्यासाची संशोधन पध्दती म्हणून प्राथमिक आणि दुय्यम सामग्रीचा अवलंब केला आहे. दुय्यम सामग्रीमध्ये प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, शोधनिबंध, अहवाल, इंटरनेट, एम.फील, पीएच.डी प्रबंध इत्यादीचा वापर करण्यात आला. प्राथमिक सामग्रीमध्ये प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती गोळा करण्यात आला आहे.

**नमुना निवड :-**

प्रस्तुत अभ्यासासाठी नियमित अंकन( साधा यादृच्छिक) नमुना पध्दतीचा वापर करण्यात आला. तासगाव तालुक्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात 10 गावाची निवड करण्यात आली आहे. 10 गावामधून 10 कुटुंबाचा अभ्यास करण्यात आला आहे.

**सांख्यिकी साधने :-**

संकलित प्राथमिक आणि दुय्यम तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, शेकडेवारी, गुणोत्तर, वृध्दीदर इत्यादी सांख्यिकी तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

**अभ्यासाचा कालावधी :-**

अभ्यासासाठी निवडलेला कालावधी हा सन 2014 ते 2018 पर्यत असून तो 5 वर्षे आहे.

**अभ्यासाच्या मर्यादा :-**

प्रस्तुत अभ्यास विषय भौगोलिकदृष्टया सांगली जिल्हयातील तासगाव तालुक्यापुरता मर्यादित आहे.हा अभ्यास करताना तासगाव तालुक्यातील 10 ग्रामपंचायतीची निवड करण्यात आला आहे.

**प्रकरण रचना :-**

1) **प्रस्तावना आणि संशोधन पध्दती**

संशोधन प्रकल्पाच्या पहिल्या प्रकरणामध्ये भारतातील प्रमुख राज्यांचा मानवी विकास निर्देशांक, महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हयांचा मानवी विकास निर्देशांक, संशोधन समस्या विधान, संशोधन अभ्यासाची व्याप्ती, संशोधन अभ्यासाचे महत्व, अभ्यासाची उद्‌दिष्टे, अभ्यासाची गृहितके, संशोधन पद्धती व तथ्य संकलन अभ्यासाचा कालावधी, अभ्यासाच्या मर्यादा,प्रकरण रचना इत्यादी घटकांचे विवेचन करण्यात आले आहे.

2) **संबंधित साहित्याचा आढवा**

प्रस्तुत प्रकरणात संदर्भ ग्रंथ, संशोधन निबंध, वर्तमानपत्रातील लेख, विविध समित्यांचे अहवाल इत्यादींचा आढावा, संशोधनाचे वेगळेपण इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे.

3) **तासगाव तालुक्याची आर्थिक व सामाजिक माहिती**

सदर प्रकरणात तासगाव तालुक्याचे भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक आर्थिक आणि लोकसंख्या विषयक माहिती घेण्यात आला आहे.

4) **माहितीचे विश्लेषण आणि स्पष्टीकरण**

प्रस्तुत प्रकरणात तासगाव तालुक्यातील वंचित घटकांचा मानवी विकास निर्देशांक ग्रामपंचायत निहाय काढण्यात आला आहे.

5) **निष्कर्ष आणि शिफारशी**

संशोधन प्रकल्पाच्या प्रकरणात प्रमुख निष्कर्ष,उपाययोजना इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे.

मानव विकास निर्देशाक हा वास्तव आर्थिक विकासाची तुलना करण्यासाठी हे एक अत्यंत उपयुक्त साधान ठरले आहे हे विसरता येणार नाही. मानवी विकासामध्ये मानवी विकास निर्देशांकाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. एवटेच नव्हे तर मानवी

विकासाची कल्पना या घटकावरून येते. वास्तविक वंचित घटक हा विकासाच्या प्रवाहापासून दूर आहेत. अशा घटकाचा मानवी विकास निर्देशांकाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष आणि शिफारशी**

सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील वंचित घटकांच्या मानवी विकास निर्देशांकाचे विश्लेषण हे हे शीर्षक असलेल्या प्रकल्पात तासगाव तालुक्याच्या मानवी विकास निर्देशांकाची सविस्तर माहिती स्पष्ट केली आहे. या प्रकरणात मानवी विकास निर्देशांका विषयी महत्त्वपूर्ण निर्णय घेताना व व निष्कर्ष काढताना मानवी विकास निदेशकांचे निर्देशक सविस्तर पणे विचारात घेतले आहेत. दीर्घायुष्य, ज्ञान व जीवनमानाचा दर्जा हे मानवी विकास निर्देशांकाचे प्रमुख निर्देशक असून यामध्ये वाढ होण्यासाठी सकस व पुरेसा आहार, पाणीपुरवठा, वीज पुरवठा, कर्जपुरवठा, वाहतूक दळणवळण, शिक्षण, आरोग्य इत्यादी सुविधांमध्ये वाढ होणे आवश्यक आहे. याकरिता सरकार समाज स्वयंसेवी संस्था इत्यादी कडून प्रयत्न होणे गरजेचे आहे. येथे तासगाव तालुक्याच्या मानवी विकास निर्देशांकात वाढ विशेषता वंचित घटकांच्या निर्देशांकात वाढ करण्यासाठी महत्त्वपूर्ण निकष संशोधनाद्वारे मांडले आहेत. त्याचप्रमाणे आवश्यक असे उपाय सुद्धा सुचवण्यात आले आहेत.

**महत्त्वाचे निष्कर्ष**

1. मानवी विकास निर्देशांक आता सगळ्यांनी देशाचा आर्थिक आणि सामाजिक विकास समजतो.

2. मानवी विकास निर्देशांक यामुळे प्रत्येक घटकाचे आपले स्थान समजू शकते.

3. दीर्घायुष्य, ज्ञान व जीवनाचा दर्जा हे मानवी विकास निर्देशांकाचे प्रमुख तीन निर्देशक आहेत.

4. अभ्यासाकरिता निवडलेल्या सर्व गावातील मानवी विकास निर्देशांक वेगळा आहे असे निदर्शनास आले.

5. ग्रामीण व शहरी भागातील मानवी विकास निर्देशांक पाहिल्यास ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागातील निर्देशांक जास्त आहे. कारण शहरी भागात ग्रामीण भागाच्या तुलनेत सेवा मोठ्या प्रमाणात उपलब्ध केल्या जातात.

6. अभ्यासासाठी निवडलेल्या गावात आरोग्य, शिक्षण, वाहतूक दळणवळण इत्यादी मध्ये वाढ झाल्यामुळे मानवी विकास निर्देशांक वाढताना दिसतो.

7. सांगली जिल्ह्यात तासगाव तालुका हा मागासलेला असला तरी तेथील मानवी विकास निर्देशांक सांगली जिल्हा पेक्षा जास्त आहे.

8. तासगाव तालुक्यात अभ्यासाकरता निवडलेल्या गावात आर्थिक भरभराटीचे, आर्थिक सुबत्ता वाढल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने विचार करतात मानवी विकास निर्देशांक वाढलेला दिसतो.

9. अभ्यासासाठी निवडलेल्या गावात शिक्षण प्रसारासाठी सरकारी आणि निमसरकारी प्रयत्न केल्यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. परिणामी शैक्षणिक निर्देशांक वाढल्याचे अभ्यासावरून दिसून येते. फक्त तीन टक्के लोकसंख्या निरक्षर आहे.

10. वाढत्या शिक्षण संस्था मुळे शिक्षण घेणाऱ्या मुली मुलांची संख्या वाढली असून शासकीय व निमशासकीय क्षेत्रातील नोकरी करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याचे दिसते.

11. तासगाव तालुक्यातील कल्याणकारी योजनांचे लाभार्थी वाढत असल्याने मानवी विकास निर्देशांक वाढत आहे.

12. मानवी विकास निर्देशांक हा शिक्षण, वाहतूक दळणवळण, लोकसंख्या, स्त्री-पुरुष प्रमाण, आरोग्य, पाणीपुरवठा, वीज पुरवठा, बँका, विमा, साक्षरता प्रमाण, लोकसंख्येची घनता इत्यादी घटकांवर अवलंबून आहे.

13. तासगाव तालुक्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या दहा गावातील प्राथमिक सर्वेक्षणानुसार तालुक्याचा आरोग्य निर्देशांक 0.580, शैक्षणिक निर्देशांक 0.887, उत्पन्न निर्देशांक 0.715 इतका येतो.

14. सण 2019 20 नुसार तासगाव तालुक्या चा मानवी विकास निर्देशांक 0.727 इतका आहे.

15. तासगाव तालुक्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या गावात सर्वात जास्त मानवी विकास निर्देशांक कवठेएकंद या गावचा असून तो 0.760 इतका आहे. तर सर्वात कमी मानवी विकास निर्देशांक बोरगाव या गावचा असून तो 0.688 इतका आहे.

16. तासगाव तालुक्यातील अभ्यासलेल्या गावांच्या निर्देशांक आवरून असे दिसून येते की शैक्षणिक आणि उत्पन्न विषय निर्देशांक पेक्षा आरोग्य निर्देशांक सर्वात कमी आहे.

17. अभ्यासावरून असे दिसून येते की शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे शैक्षणिक निर्देशांक हा सर्वात जास्त दिसून येतो.

18. सर्वसाधरण गटातील मानवी विकास निर्देशांक सर्वात जास्त (0.739) त्याच्या खालोखाल ओ.बी. सी. गटातील मानवी विकास निर्देशांक आहे. सर्वात कमी मानवी विकास निर्देशांक एस.टी. जातीचा आहे.

शिफारशी

1. मानवी विकास निर्देशांक ज्या विविध घटकांवर अवलंबून आहे अशा घटकांचा पुरवठा मुबलक स्वरूपात उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

2. तासगाव तालुक्यातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांचा मानवी विकास निर्देशांक वाढवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

3. तासगाव तालुक्यातील सर्वांगीण विकास होण्यासाठी मानवी विकास निर्देशांक वाढविणे अत्यंत गरजेचे आहे.

4. तासगाव तालुक्यामध्ये ऐतिहासिक, धार्मिक, नैसर्गिक पर्यटन स्थळांचा विकास केल्यास लोकांच्या उत्पन्नात वाढ होईल. त्यामुळे मानवी विकास निर्देशांक वाढेल.

5. तासगाव तालुक्यातील विशेषतः दुष्काळी भागातील दारिर्द्य आणि बेकारी कमी करण्यासाठी सरकारने रोजगार सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

6. तासगाव तालुक्यातील औद्योगिकदृष्टया मागास भागात नवीन उद्योगांचा विकास व विस्तार करणे गरजेचे आहे.

7. तासगाव तालुक्यात व्यवसायिक शिक्षणाचा अजूनही म्हणावा तसा विकास झालेला नाही. हा विकास साध्य करण्यासाठी सरकारने उपाययोजना त्वरित करावी.

8. आरोग्याच्या दृष्टीने विचार केल्यास तालुक्यातील आरोग्य केंद्रांची संख्या कमी आहे. त्यामध्ये वाढ करणे गरजेचे आहे. कारण मुबलक प्रमाणात उपलब्ध नसलेल्या आरोग्यसेवा मुळे आरोग्य निर्देशांक कमी दिसून येतो.

9. तासगाव तालुक्यातील मानवी विकास निर्देशांक वाढविण्यासाठी शासकीय कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

10. तासगाव तालुक्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती इं चा मानवी विकास निर्देशांक वाढवण्यासाठी तरी कारणे नवनवीन उपाययोजना करावी.

## सारांश

सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील वंचित घटकाच्या मानवी विकास निर्देशांक चा अभ्यास करताना मानवी विकास निर्देशांक आचे निर्देशक विचारात

घेतले आहेत. वंचित घटकांचा निर्देशांक विकसित घटकाच्या निर्देशांकाची तुलना करता कमी दिसून येतो. कारण असं घटकापर्यंत आज ही योजना पोचले नाहीत. पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी सरकारने नवनवीन योजना हातात घेणे गरजेचे आहे. तरच तासगाव तालुक्यात साम मानवी विकास निर्देशांक वाढत जाऊन तालुक्याचा सर्वांगीण विकास होईल व याचा सर्वांना सार्थ अभिमान वाटेल.